# श्री वारणा सहकारी बँक लि., वारणानगर

हेडऑफीस-वारणानगर, जिल्हा-कोल्हापूर.

# व्यवसाय प्रतिनिधी (Business Correspondents) व व्यवसाय समन्वयक (Business Facilitators) २०२५-२६

**विषय : व्यवसाय प्रतिनिधी (Business Correspondents) व व्यवसाय समन्वयक (Business Facilitators) नेमणूकीचे धोरण.**

**संदर्भ : रिझर्व्ह बँकेकडील जा.क्र. मु.क्षो.का./बीएसएस-।।।/४२१५/ १२.०७.२४३/ २०१८-१९, दि. ०६/०३/२०१९ चे पत्र.**

रिझर्व्ह बँकेने संदर्भिय पत्राद्वारे बँकेस व्यवसाय प्रतिनिधी व व्यवसाय समन्वयक यांचे माध्यमातून ग्राहकांना बँकींग सेवा देणेस मान्यता दिलेली असून याबाबतचे धोरण खालील प्रमाणे राहील.

**अ) बिझीनेस करसपाँडंट एजंट ने द्यावयाच्या सेवा :**

१) नवीन ग्राहक शोधणे.

२) कर्ज मागणी अर्जांचे एकत्रिकरण व प्राथमिक स्वरूपाची पडताळणी करणे (यात कर्जदाराची प्राथमिक स्वरूपाची माहिती/डाटा याची पडताळणी अपेक्षित आहे.)

३) बँकेचे कर्ज व ठेव धोरणाबाबत ग्राहकांना/अपेक्षित ग्राहकांना माहिती देणे, त्यांना आर्थिक साक्षर (Financial Literate) बनविणेच्या दृष्टीने प्रशिक्षण देणे व आर्थिक साक्षर बनविणे.

४) कर्ज मागणी अर्ज बँकेत/शाखेत सादर करणे.

५) कर्ज वितरणानंतरची निगराणी (Monitoring)

६) कर्ज वसूलीबाबत पाठ पुरावा.

७) अल्प रक्कमेचे कर्ज वाटप

८) कर्ज वसूली

९) अल्प रक्कमेच्या ठेवी स्विकारणे

१०) पेमेंट इन्स्ट्रुमेंटस स्विकारणे/पोहोच करणे.

**ब) व्यवसाय प्रतिनिधी म्हणून नेमणूक होणेस खालील व्यक्ती पात्र राहतील.**

**I)** १. बँकेचे निवृत्त कर्मचारी.

२. निवृत्त लष्करी कर्मचारी

३. निवृत्त सरकारी अधिकारी

४. निवृत्त शिक्षक

५. वैयक्तीक : किरणा दुकानदार/ रास्त भाव माल विक्री दुकानदार

---२...

६. सरकारी स्मॉल सेव्हींग स्किम विक्री/विमा प्रतिनिधी

७. बँकेस योग्य वाटेल अशी व्यक्ती

८. कंपनी कायदा १९५६, कलम २५ अंतर्गत नोंदणीकृत कंपनी

९. कार्पोरेज एंटीटीज

**II) इतर वर्गीकरणातील**

१. ट्रस्ट कायदा/संस्था कायद्यान्वये सभासद झालेल्या अशासकीय संस्था (NGO)/मायक्रो फायनान्स इन्स्टीट्युट (MFIs)

२. महाराष्ट्र सहकारी संस्था कायद्यान्वये स्थापन झालेल्या संस्था.(पतसंस्था व विविध कार्यकारी सहकारी संस्था पात्र नाहीत)

**टिप : १. बँकेचे संचालक, त्यांचे नातेवाईक, बँकेचे कर्मचारी यांना व्यवसाय प्रतिनिधी/समन्वयक म्हणून काम करता येणार नाही.**

**२. व्यवसाय प्रतिनिधीनी बँकेच्या कामकाजाच्या कार्यकक्षेत (Normal course of banking business) सेवा देणेच्या आहेत.**

**क) I) व्यवसाय प्रतिनीधी नेमणूक पात्रता निकष :**

१) किमान पदवीधर अगर तत्सम शैक्षणिक अर्हता वाणिज्य शाखेच्या उमेदवारांना प्राधान्य राहील. (पिग्मी एजंट व्यवसाय प्रतिनिधीचे काम करणेस तयार असतील तर त्यांचेसाठी सदरची अट शिथिल राहील)

२) वय किमान २२ ते ६० इतपत (निवृत्त उमेदवाराकरीता सदर अट शिथिल राहील.)

३) संगणक प्रणाली व हिशोबी (Account) ज्ञान असणे आवश्यक आहे.

४) बँकेच्या कार्यक्षेत्राची समाधानकारक माहिती असावी.

५) कोणत्याही राजकीय/धार्मिक संस्थेशी संलग्न नसावा

६) कोणत्याही स्वरूपाचे गुन्हेगारी रेकॉर्ड नसावे.

७) बँकेशी संलग्न असणाऱ्या व बँकेस मान्य असणाऱ्या किमान २ व्यक्तीनी त्यास संदर्भित (Referred) केले असावे.

८) संबंधीतांची पत/प्रतिष्ठा, आर्थिक साक्षरता, क्षमता, तांत्रिक कौशल्य याची खातर जमा केली जाईल.

**II) व्यक्ती व्यतिरीक्त पात्रता निकष**

१) बँकेच्या शहरी/ग्रामीण विभागाची सर्वंकष माहिती असावी.

२) कार्य समाधानकारक असावे.

३) बँकेशी संलग्नता समाधानकारक असावी.

---३...

४) उत्कृष्ट स्वरूपाचे नियमन (Well regulated) व कार्यरत असणाऱ्या संस्थाना प्राधान्य, आर्थिक व्यवहारात अनियमितता नसावी.

**टिप : १) व्यवसाय प्रतिनिधी/समन्वयक म्हणून नेमली जाणारी व्यक्ती/संस्था यांना एकाचवेळी अशा प्रकारे अन्य बँकेत/एनबीएफसी/इतर आर्थिक स्वरूपाचे व्यवहार करणाऱ्या संस्थात काम करता येणार नाही.**

**२) पात्रता निकष शिथिल करणेचा अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी/विभागीय अधिकारी यांना राहील.**

**ड) व्यवसाय प्रतिनिधी/समन्वयक नेमणूकीचे प्राथमिक स्वरूपाचे अधिकार संलग्न शाखाधिकारी यांना राहतील. त्यांनी संबंधीताबाबत खालील बाबींची खातरजमा व पडताळणी करणेची आहे.**

१) संबंधीतांची आर्थिक स्थिती/दर्जा, समाजामधील मान्यता इ. बाबत माहिती

२) संस्था असलेस प्रशासकीय व्यवस्थेबाबत तपशील

३) ग्राहकांच्या माहितीचे विश्लेषण, कागदपत्रांची पूर्तता, रेकॉर्ड ठेवणे याबाबतची सक्षमता

४) विविध क्षेत्रातील कामाची माहिती.

५) ज्या ठिकाणी प्रतिनिधी म्हणून काम केले जाणार आहे. त्या ठिकाणी व्यक्ती/संस्थेच्या कामाबाबतची बांधिलकी, नैतिकता व क्षमतेबाबतचा दर्जा.

**इ) निवड प्रक्रिया**

१) व्यवसाय प्रतिनिधी/समन्वयक यांची रिझर्व्ह बँकेच्या निकषाप्रमाणे व बँक धोरणाप्रमाणे व्यवहार्यता (Viability) पडताळणीसाठी मा. एक्झीक्युटीव्ह कमिटी/विभागीय कमिटी यांचेसमोर मुलाखत होवून त्यांनी निवड केलेल्या उमेदवारांची यादी अंतीम मंजूरीकरीता मा.संचालक मंडळ सभेपुढे सादर करणेत येईल.

२) वरील समितीच्या रिपोर्टआधारे संचालक मंडळ व्यवसाय प्रतिनिधी यांची आवश्यकता ठरविल.

३) संबंधीत शाखा स्थानिक वृत्तपत्रात पात्र उमेदवारांकरीता जाहीरात प्रसिध्द करेल.

४) शाखास्तरावर आलेल्या अर्जावर शाखाधिकारी त्यांचा अभिप्राय घेवून निवड समितीकडे पाठवतील.

५) संचालक मंडळ/निवड समिती मुलाखती घेवून अंतिम निर्णय घेईल.

६) अंतिम निवड झालेल्या उमेदवार/संस्था यांना बँकेच्या अटी/शर्ती स्विकारून याबाबतचा करार करावा लागेल.

---४...

७) पिग्मी ठेव संकलन करणाऱ्या व्यवसाय प्रतिनिधी यांनी बँकेत रू.२५,०००/- इतकी ठेव ठेवणेची आहे. याखेरीज बँक ठरविल त्याप्रमाणे ताब्यात दिलेल्या मायक्रो एटीएम ची सुरक्षेपोटी ठेव ठेवणेची आहे. सदर व्यक्ति पिग्मी व्यवसायाव्यतिरीक्त अन्य व्यवसाय करणार असेल तर रू.५०,०००/- डिपॉझीट ठेवावी लागेल त्यावर कर्ज मंजूर केले जाणार नाही.

८) व्यवसाय प्रतिनिधी यांचेकडे त्यांना त्यांना नेमून दिलेल्या कामाकरीता जी रोख शिल्लक त्यांचे जवळ राहील त्याचा बँकेकडून विमा उतरविला जाईल.

**ई) व्यवसाय प्रतिनीधी यांनी करावयाची कामे प्रति महिना करावयाचे किमान काम व मानधन**

**I) करावयाचे कामकाज**

१) ठेव खातेबाबत प्रसार, फॉर्म प्रोसेस करणे, जरूरती माहिती/कागदपत्रे घेणे.

२) बँकेच्या धोरणाप्रमाणे योग्य ग्राहकांची निवड करणे.

३) कर्ज मागणी अर्जातील प्राथमिक माहिती/कागदपत्रे जमा करणे. माहिती/डेटा पडताळणी करणे.

४) आर्थिक साक्षरता अभियान राबवून बॅकेच्या सेव्हींग/इतर ठेव योजनांची माहिती देणे

५) ठेव/कर्जाचे अर्ज संबंधीत शाखेत जमा करणे.

६) कर्ज मंजूरी/वाटप यानंतर वसूली बाबत पाठपुरावा करणे.

७) बँक ग्राहक/संबंधीतांना नोटीस, पत्रे, स्मरणपत्रे पोहोच करणे.

८) अल्प रक्कमेची प्रतिदिन प्रतिग्राहक रू. १०,०००/- (अक्षरी रक्कम रूपये दहा हजार फक्त) ठेव स्विकारणे.

९) प्रति ग्राहक रू. ५,०००/- (अक्षरी रक्कम रूपये पाच हजार फक्त) इतकी ठेव आदा करणे.

१०) प्रति ग्राहक प्रतिदिन रू. ५,०००/- (अक्षरी रक्कम रूपये पाच हजार फक्त) इतपत कर्ज आदा करणे.

११) व्यवहार 'आयसीटी'(Information Communication and Technology) माध्यमातुन केले जातील.

१२) वरील सेवां व्यतिरीक्त बँकेचे सक्षम अधिकारी यांनी सोपविलेली कामे.

**टिप : व्यवसाय प्रतिनिधी व समन्वयक यांनी आपला ग्राहक ओळख या रिझर्व्ह बँकेच्या निर्देशाअंतर्गत वेळोवेळी माहिती व पूर्तता करून देणेची आहे.**

**II) प्रति महिना करावयाचे अपेक्षीत कामकाज**

| अ.नं. | कामाचे स्वरूप | कामाची व्याप्ती |
|---|---|---|
| १ | नवीन ठेव खाती सुरू करणे | किमान २० खाती |
| २ | नवीन कर्ज खाती प्रोसेस करणे | किमान ०५ खाती |
| ३ | विमा विक्री | किमान ०५ खाती |
| ४ | पॉस/मायक्रो एटीएम माध्यमातून व्यवहार | किमान ५० व्यवहार |
| ५ | ग्राहक/आर्थिक साक्षरता कँम्प | किमान १ |

---५...

## III) मानधन

| अ.नं. | दिल्या जाणाऱ्या सेवा | मानधन |
|---|---|---|
| १ | सेव्हींग/रिकरींग/चालू खाते/पिग्मी सुरू करणे | रू. २०/- प्रति खाते |
| २ | मायक्रो एटीएम माध्यमातून कॅश डिपॉझीट | ०.५०% कमाल रू. १००/- |
| ३ | मायक्रो एटीएम माध्यमातून कॅश विथड्रॉवल | ०.५०% कमाल रू. १००/- |
| ४ | नॉन कॅश ट्रान्झॅक्शन | रू. ०.५०/- प्रति व्यवहार कमाल रू.१००/- |
| ५ | मुदत ठेव जमा करणे | ०.२०% जमा रक्कमेवर व कमाल रू. ३००/- |
| ६ | अनुत्पादक वर्गीकरण व निर्लेखित खात्यांची वसूली | - अनुत्पादक जिंदगी वसुली केलेस वसूली रक्कमेच्या ०.२५%<br>- निर्लेखित खात्यातील वसूली रक्कमेच्या ०.५०% |
| ७ | नवीन कर्ज खाते मंजूरी व वाटप | ०.२५% वाटप रक्कमेच्या (फक्त तारणी कर्जाकरीता मालतारण कर्जे वगळून)<br>१)मध्यम मुदत कर्ज सर्व कागदपत्रांची पुर्तता झालेनंतर प्रत्येक उचलीस ०.२५%<br>२)क्लिन कर्ज कसगदपत्रांची पुर्तता झालेनंतर मंजूर मर्यादेच्या ०.२५% |
| ८ | कर्ज खाते नुतनीकरण | मुदतीत कागदपत्रांची पुर्तता करून नुतनीकरण झालेस प्रती खाते नुतनीकरणापोटी मिळालेल्या प्रोसेस फीच्या २५% |
| ९ | विमा | बँकेस मिळणाऱ्यार कमिशनच्या ५% |
| १० | आर्थिक साक्षरता कॅम्प | प्रति कॅम्प रू. १००/- |
| ११ | पिग्मी | |
| | अ)बचतीसाठी उघडणेत आलेल्या (पिग्मी) ठेव खात्यासाठी | कमिशन- २.५०% |
| | ब)कर्ज खातेच्या परतफेडीसाठी उघडणेत आलेल्या पिग्मी ठेव खात्यासाठी | कमिशन- १.००% |

## प) व्यवसाय प्रतिनिधी यांचे कामकाज नियंत्रीत करणेची पध्दत :

व्यवसाय प्रतिनिधी यांचे कामकाजावर बँकेची प्रतिष्ठा अवलंबुन आहे. याकरीता त्यांचे कामकाजावर खालील प्रमाणे नियंत्रण ठेवणेचे आहे.

१) व्यवसाय प्रतिनिधी यांनी बँक ग्राहकांना प्रत्यक्ष जावुन (Door Step) सेवा द्यावयाची असलेने त्यात अनियमितता आढळल्यास अशा बाबी शाखा व्यवस्थापक/विभागीय कार्यालय यांनी गांभिर्याने घेणेच्या आहेत.

२) विभागीय कार्यालयाशी सल्ला मसलत करून व्यवसाय प्रतिनिधी यांना कामकाजाबाबत लक्षांक देणेचा असून त्याचा मासिक स्वरूपाचा आढावा घेणेचा आहे. सतत ३/४ महिने कामकाज समाधानकारक नसेल तर त्यांची सेवा खंडीत करणेची शिफारस विभागीय कार्यालयामार्फत करणेची आहे.

३) शाखा पातळीवर व्यवसाय प्रतिनिधी यांच्या कामाचे नियोजन/व्यवस्थापन ज्या प्रकारे केले जाईल तो शाखा कामकाज मुल्यमापनाचा भाग राहील.

---६...

४) व्यवसाय प्रतिनिधी यांनी त्यांना नेमून दिलेल्या भागात कामकाज करणेचे आहे. शाखा पातळीवरून करणेचे नाही याची खात्री शाखा व्यवस्थपकानी वेळोवेळी करणेची आहे.

५) व्यवसाय प्रतिनिधी यांच्या कामकाजाबाबत तक्रार आलेस तिची प्राधान्याने निर्गत करणेची आहे.

६) वर नमूद नियंत्रण पध्दतीने प्रसंगानुसार बदल करणेत येईल.

**भ) तक्रार निवारण समिती (Constitution of Grievance Redressal Committe) :**

नेमलेल्या व्यवसाय प्रतिनिधी/समन्वयक यांनी सामंजस्य करारातील (एमओयु) अटी, शर्ती, सूचना यांना अधिन राहून कामकाज करणेचे असून त्यांना त्यानुसार नेमुन दिलेल्या कामकाजाबाबत ग्राहकांकडून तक्रार आलेस अगर कामकाज समाधानकारक नसलेस सामंजस्य करारातील तरतुदीनुसार कारवाई करणेत येईल, करार रद्द करणे, सेवा खंडीत करणे इ. स्वरूपाची कारवाई असेल व याबाबत बँकेचा निर्णय अंतिम राहील.

बँकेची सध्याची एक्झीक्युटीव्ह कमिटी व शाखा विभागीय समिती **'तक्रार निवारण समिती'** म्हणून काम पाहतील.

**श्री वारणा सहकारी बँक लि.,**



**(राजेश प. सार्दळ)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**